
# IJRSSIS

Four Monthly Peer Review Journal

Online ISSUE

ISSN No. 2347-8268 (Online), ISSN No. 2347-8209 (Print)

## International Journal of Researches in Social Science & Information Studies



Global Peace Multipurpose Society

VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY

NAGPUR, M.S. INDIA

Scanned with OKEN Scanner

International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
January 2015
Volume-I , Issue-III
Online Journal
ISSN No. 2347-8268

# रमाबाई रानडे आणि स्त्री सुधारणेचे कार्य

अरुण बी. आलेवार
इतिहास विभाग प्रमुखए डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,कोंढा–कोसरा,
ता. पवनी, जि. भंडारा

**सारांश –**

भारतात सर्वप्रथम बंगालमध्ये प्रबोधन चळवळीला प्रारंभ झाला. त्यानंतर हळूहळू प्रबोधन चळवळ इतरही प्रांतात पसरली. प्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक समस्या दुर करण्याच्या प्रयत्न केल्या गेला. आपला समाज प्रगत व्हावयास हवा, ही प्रगती आपल्या धर्मातील रुढी नष्ट झाल्याशिवाय होणार नाही त्यासाठी समाजसुधारणा घडून येणे आवश्यक आहे ही जाणीव सुधारकांना झाली. म्हणूनच महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, न्या. रानडे यांच्यासारख्या सुधारकांच्या कार्याने महिलावर्गाला नवसंजिवनी मिळाली. त्यानी समाजात असलेल्या अनिष्ट, वाईट चालीरीतींवर प्रहार करुन स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. म्हणूनच समाजकार्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांसुद्धा सहभागी झाल्या. सुधारकांची फार मोठी पिढी महाराष्ट्रात तयार झाली. त्यातुन पुढे रमाबाई रानडे स्त्री सुधारणा चळवळीत सहभागी झाल्यात. रमाबाईनी न्या. रानडेंच्या छत्रछायेकाली हळूहळू सामाजिक कार्याचे ज्ञान घेतले. त्यानंतर त्यांनी आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन संपूर्ण आयुष्य स्त्रियांच्या विकासासाठी वाहून घेतले. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, मतदानाचे हक्क आणि सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी लढा उभारला. रमाबाईच्या कार्यामुळे अनाथ, परित्यक्त्या, अबला स्त्रियाच्या जिवनातील अधार दूर झाला. तसेच त्यांनी सेवासदन या संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांना रोजगार उपलब्ध करुन दिला. रमाबाईच्या कार्याने पुण्यात स्त्री चळवळीला गती मिळाली. त्याचप्रमाणे रमाबाईनी स्त्रीयांचे दुःख आपले समजून सतत कार्य करीत राहील्या. रमाबाईनी पती निधनानंतर न खचता तेवढयात जोमाने स्त्री सुधारणेचे कार्य केले. त्यांच्या कार्याची माहिती समाजाला व्हावी, या हूतूने हा शोधनिबंध सादर करीत आहोत.

**प्रस्तावना –**

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीयांची पाश्चिमात्य संस्कृतीशी ओळख झाली. त्यानंतर भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. पाश्चात्य शिक्षण घेवून नवा

उच्चविद्याविभूषित वर्ग समाजात उदयास आला. याच वर्गाने समाजात असलेल्या वाईट चालीरीतींना समाजाबाहेर काढण्याकरीता प्रबोधन चळवळ उभारली. प्रबोधनाच्या माध्यमातून विविध प्रथेंवर टीका केली. महाराष्ट्रातही दिशाहीन समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी 19 व्या शतकात सुधारकांनी प्रयत्न केले. त्यामुळे स्त्री जीवनाला गती मिळाली. हळूहळू समाजकार्यात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रियासुद्धा पुढे आल्या. सावित्रीबाई फुले, आनंदीबाई कर्वे, डॉ. कमलाबाई देशपांडे, पंडिता रमाबाई आणि रमाबाई रानडे यानी स्त्री सुधारणेची चळवळ उभारली. रमाबाईनी शतकानुशतके चार भिंतीच्या आत दडलेल्या स्त्रियाच्या समस्या दूर करण्याचे कार्य केले. त्यांनी आपल्या संथ गतीने स्त्री सुधारणा चळवळीला प्रारंभ केला. नंतर स्त्रियांच्या विविध समस्या घेवून त्यांनी लढा दिला. पुण्यात आर्य महिला समाजाचे कार्य करताना रमाबाईना घरच्या गृहीणीचा विरोध सहन करावा लागला. परंतु त्यांच्या पिंड मुळातच समाज कार्याकरीता बनलेला असल्यामुळे त्यांनी मनात कोणतीही भिती न बाळगता सभेत व्याख्याने दिलीत. रमाबाईमध्ये असलेली जिद्द, चिकाटी, स्वस्थ बसू देत नव्हती. रमाबाईनी विविध संघटनेच्या व्यासपिठावर महीलांच्या विविध समस्यावर आपले मत मांडले. केवळ सामाजिकच नव्हे तर राजकिय प्रश्नावरही चर्चा केली. रमाबाईच्या अथक प्रयत्नाने पुण्यात स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळाला. त्यांच्या कार्याला ग्रामीण भागातसुद्धा समर्थन मिळाले. रमाबाईनी सेवासदन सोसायटीच्या माध्यमातून स्त्रियांना सन्मानाने जिवन जगण्याचे शिकविले. निश्चितपणे रमाबाईचे कार्य अलौकीक अशा स्वरुपाचे आहे. दुष्काळाच्या परिस्थितीतही रमाबाईनी मोलाची मदत केली. रमाबाईच्या प्रेरणेतून अनेक महिला गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाल्यात.

**रमाबाईचे कार्य –**

न्या. रानडे पुण्यात 1883 साली सर्व जाती धर्माच्या लोकांची सभा घेतली. ह्या सभेत विल्यम वेडरबर्न, रा.ब. पंडित, रमाबाईसुद्धा हजर होत्या. मुलींच्या शिक्षणासाठी हायस्कूल सुरु व्हावे म्हणून पुण्यातील हिराबागेतल्या सभेत गव्हर्नर रमाबाईनी निवेदन दिले. पूढे 1884 मध्ये फिमेल हायस्कूल सुरु झाले. मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने फिमेल हायस्कूल फायदेशिर ठरले. फिमेल हायस्कूलमधून शिकलेल्या पुष्कळ मुली पदविधर होवून समाजसेवा करु लागल्या.

1885 मध्ये राष्ट्रिय काँग्रेसची स्थापना झाल्यावर पुढाऱ्यांनी सामाजिक स्थितीचा आढावा घेतला त्यात न्या. रानडे प्रमूख होते. त्यांनी समाजातील समस्या सोडविण्यासाठी



Scanned with OKEN Scanner

राष्ट्रिय सभेला जोडून 1987 साली सामाजिक परिषदेची स्थापना केली. या परिषदेत रमाबाईनी सहभाग घेतला नाही तर संमती वयावर आपले मत व्यक्त केले.

रमाबाईनी स्त्रियांच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी आणि व्यासपिठ निर्माण करण्यासाठी 'हिंदू लेडीज सोशल क्लबची' ची स्थापना मुंबईत केली. या क्लबमधून त्यांनी स्त्रियांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून नवनवे विचार मांडले. स्त्रियांचा रमाबाईच्या कार्याला व्यापक पाठिंबा मिळत असतांना 1901 मध्ये न्या. रानडे यांचा मृत्यु झाला. हा काळ दुःखदायक आणि निराशाजनक होता. त्यानंतर रमाबाई मुंबई सोडून पुण्याला राहू लागल्या. सुमारे एक वर्ष त्यांनी एकाकी आयुष्य व्यतित केले. त्यानंतर त्या मात्र त्या सामाजिक आयुष्यात सक्रिय झाल्या आणि त्यांनी भारत महिला परिषदेचे मुंबई येथे आयोजन केले. पुण्यात हिंदू लेडीज सोशल क्लबच्या माध्यमातून स्त्रियांना प्राथमिक उपचार, शिवणकाम, प्रौढ शिक्षणाचे धडे दिले. तसेच क्लबमधील वयोवृद्ध सभासदांनी धार्मिक ग्रंथ वाचनाचे वर्ग उघडले. 'हिंदू लेडीज सोशल क्लब' ही स्त्रियांची संस्था सर्वस्तरावरील जुन्यानव्या विचारांच्या स्त्रियांमध्ये फार लोकप्रिय झाली. स्त्री उद्धाराचे कार्य करुन त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी 1904 मध्ये पुण्यातील येरवडा तुरुगांस भेट देवून गुन्हेगारांना निरंतर पापी न समजता त्यांना माणूसकीची वागणूक दिली. त्यावेळी रमाबाईनी नेहमीच तुरुगांतील स्त्रियांमध्ये आत्मसन्मान जागृत केले. रमाईच्या कर्तृत्वाचा वाढता आलेख पाहता 1904 मध्ये रमाबाईची भारत महिला परिषदेच्या अध्यक्ष म्हणून निवड झाली. या परिषदेच्या व्यासपिठावरुन सर्व जातीधर्माच्या स्त्रियांनी एकत्र येवून राष्ट्रहीत साधण्याचे प्रयत्न केले. रमाबाईनी स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करणे, परस्पर स्नेहभाव वाढविणे, स्त्रि–पुरुष समानता आणणे ही उदीष्टे ठेवली होती.

रमाबाईनी विधवा, परितक्त्या व रंजल्यागांजल्याना आधार दिला. आपल्या समाजातील विधवा, परितक्त्या व अनाथ स्त्रियांनी अवहेला रमाबाईच्या जिव्हारी लागली होती. अशा स्त्रियांमध्ये मनोबल वाढविण्यासाठी रमाबाईनी सेवासदन या संस्थेची 1908 मध्ये स्थापना केली. स्त्रियांच्या उद्धारासाठी सुरु झालेल्या या चळवळीचे मुर्तरुप म्हणजे ही संस्था होय. रमाबाईना सुरुवातीला ही संस्था सुरु करतांना अनेक आर्थिक समस्या उभ्या झाल्या. परंतु मुंबईतील नामवंत मंडळीनी अर्थ साहय केले. थोडयाच कालावधीत या संस्थेचा व्याप वाढला. स्त्रियांच्या आरोग्यासाठी मोफत दवाखाना सुरु केला. याशिवाय स्त्रियांचे कशिदा वर्ग व शिवणकामाचा वर्ग घेतले जात होते. ज्या स्त्रियांना मुळाक्षरांची



Scanned with OKEN Scanner

ओळख नव्हती, अशा स्त्रियांना शिक्षणाची सोय केली. त्याच प्रमाणे सेवासदनामध्ये स्त्रियांना रुग्णसेवेचे प्रशिक्षण देवून समाजात रुग्णसेविका निर्माण केले. हळूहळू या संस्थेचा विस्तार झाला. आणि 1915 मध्ये पुणेयेथे सेवासदनाची शाखा उघडली. रमाबाईच्या कार्यात गोपाळकृष्ण देवधर, गीडूमल व मलबारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ' भेद मतमतांतरी परी एकची अंतरी' हे सेवासदनचे ब्रीदवाक्य होते. रमाबाईनी सेवासदनातील स्त्रियांना मातृतुल्य प्रेम दिले. रमाबाईच्या नेतृत्वात सेवासदनात विणकाम, भरतकाम व यंत्रावर पायमोजे विणणे या सारखी कामे चालत. हे वर्ग गरीब स्त्रियांसाठी चालविल्या जात होते. रमाबाईनी गरीब, श्रीमंत, मध्यम हा भेदभाव मनात न आणता प्रत्येकाशी प्रेमाणे वागत होते. स्त्री शिक्षणाच्या वर्गा व्यतीरिक्त चित्रकला, गायन, सृष्टिशास्त्र इ. विषय शिकवले जाई. त्याचप्रमाणे या संस्थेतर्फे गोर–गरीब विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जात असत. सेवासदनामध्ये स्त्रियांना राहण्यासाठी त्यांनी वस्तीगृहे सुरु केली. 'कमवा व शिका' ही योजना सुरु करुन आर्थिक सुबत्ता प्राप्त करुन दिली. स्त्रियांना वैद्यकीय, औद्योगिक, स्वयंरोजगार, व्यावसायीक शिक्षण सेवासदनातून दिले. त्याचप्रमाणे 'महिला विजय' नावाचा छापखाना चालविण्यात आले. स्त्रियांसाठी आरोग्य, शैक्षणिक इ. विषयावर माहिती देण्यासाठी लहानलहान पुस्तके प्रसिद्ध करोत होते. सेवासदनची दिवसेंदिवस व्याप्ती वाढत गेली. आणि अहमदनगर, बारामती, सोलापूर, नागपूर या ठीकाणी शाखा सुरु झाल्या. अशा रितीने रमाबाईनी स्त्रियांना शिक्षणाचे धडे देवून आपल्या संस्थेचा नमुना लोकांच्या पुढे ठेवला होता. रमाबाई एवढेच कार्य करुन थांबल्या नाहीत तर स्त्रियांना मतदानाचा हक्क सुद्धा मिळाले पाहीजे या मागणीला त्यांनी पांठिबा दिला. रमाबाईनी स्त्रियांमध्ये राजकिय जागृती करुन ऐक्य घडवून आणले. देशाच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रींयाचा सहभाग होणे गरजेचे होते. म्हणूनच रमाबाईनी स्त्री मताधिकारासाठी पुण्यात संघर्ष केलेत. 1917 ला मॉंटेग्यू– चेम्सफर्ड यांच्या मद्रास मुक्कामात विमेन्स इंडियन असोसिएशनच्या स्त्रियांनी निवेदन दिले. तेव्हा रमाबाईनी या प्रस्तावाला तार पाठवून पाठिंबा दर्शविला होता.

रमाबाईनी या काळात मुंबई व पुणे इलाख्यातील सभेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. 12 जुलै 1921 रोजी स्त्रियांची मुंबई फार मोठी सभा झाली. त्या सभेत रमाबाई प्रमुख मार्गदर्शक होत्या. रमाबाई आपल्या शंभर भगीनीसह कौन्सीलच्या गॅलरीत चर्चा ऐकत होत्या. सरतेशेवटी महिलांच्या बाजूनं निर्णय लागला. स्त्री मताधिकाराचा विजय

रमाबाईच्या कार्याशी संबंधीत होता. रमाबाईनी केलेले कार्य पुढील काळातील स्त्रियांसाठी लाभदायक ठरले. रमाबाईनी मुलींना मोफत व शक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे या करीता 1918 साली आंदोलन केले. शिक्षणाच्या अभावामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वास समाजात वाव नव्हता. त्यामुळे स्त्रियांना अनेक अत्याचार सहन करावे लागले. पुणे म्युनिसीपालीटी मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्यास तयार नव्हते. तेव्हा रमाबाईनी मुलींनासुद्धा मुलांबरोबर शिक्षण मिळाला पाहिजे असा आग्रह धरला. पुण्यातील प्रमुख स्त्री कार्यकर्त्याशी चर्चा केली. पुण्यातील पश्चिम भागातील मोर्चाचे नेतृत्व रमाबाईनी केले. या मोर्चाना छबीना असे नाव देण्यात आले. या मोर्चात रमाबाई सोबत सेवासदनातील स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. त्यानी महानगरपालीका प्रशासनाच्या दुटप्पी धोरणाच्या विरोधात नारे लावले होते. नंतर अनेक वाटाघाटी झाल्या. शेवटी मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. पुणे महानगरपालीकेने घेतलेला निर्णय रमाबाईनी दिलेल्या लढयाचा तात्विक विजय होता. या निर्णयामुळे गोर–गरीब मुलींना शिक्षणाचा हक्क मिळाला.

**समारोप –**

रमाबाईनी आपल्या संथ परंतु निश्चित अशा कार्याने अनेक स्त्रियांना विकासाच्या वाटा उपलब्ध करुन दिल्या. रमाबाईनी पुण्यात स्त्री मुक्ती लढा तेवत ठेवण्याचे कार्य केले. रमाबाई विधवांचे दुःख पाहून कळवळल्या आणि समाजाच्या परंपरेचे शुद्धीकरण करण्यासाठी प्रयत्न केलेत. अनाथ, परितक्त्या, स्त्रियांना सबला केले. रमाबाईनी स्त्रियांना शिक्षण आणि मतदानाचा हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष उभारला. चूल व मूल हे स्त्री जीवनाचे अंतीम उद्दीष्ट नाही हे दाखवून दिले. म्हणून त्याच्या प्रेरणेतून स्त्रियांनी स्वातंत्र्य लढयात उडी घेतली. रमाबाईनी तळागाळातील स्त्रियांना सेवासदनातून स्वांवलबी बनविले. आधूनिक काळातील स्त्री घडविण्यात रमाबाईच्या अष्टपैलू कार्याचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे.

**संदर्भग्रंथ –**

1) रानडे रमाबाई, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, वरदा प्रकाशन, पुणे, 2000.
2) कणगली एस.एम., पुण्याचे माहितगार, पुणा डायेक्टरी हाऊस, पुणे, 1949.
3) फडके ना.वा., गोपाळकृष्ण देवधर चरित्र, आर्यभूषण छापखाना पुणे, 1936.
4) भेंडे उमाकांत, श्रीमती रमाबाई रानडे, हिंद महिला पुस्तकालय पुणे. 1924.



Scanned with OKEN Scanner

5) विद्वांस मा.श्री., श्रीमती रमाबाई रानडे:व्यक्ती आणि कार्य, मॅजेस्टिक प्रकाशन पुणे. 1989.

6) वैद्य मा.गो., प्रार्थना समाजाचा इतिहास, प्रार्थना समाज मुंबई, 1927.

7) फाटक न.र., महादेव गोविंद रानडे चरित्र, न.र.फाटक ठाकुरद्वार मुंबई, 1924.

8) पवार जयसिंगराव, आधूनिक हिंदूस्थानचे इतिहास, नागपूर.

9) Shah A.B.(Ed.), The Letter & and Corresponding of Pandita Ramabai, Secretary Maharashtra State Board for literature and Culture, Mantralaya, Bombay- 1977